# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


**अतितात्काळ**

क्रमांक: २अ/एडीएम/२०१५/३९४

दिनांक : 24 FEB 2015

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती, नागपूर

**विषय:- सामाजिक मागास विद्यार्थ्यांकडुन प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची आकारणी न करण्याबाबत..**

**संदर्भ** : १. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टिईएम२०११/(१८७/११)/तांशि-४, दिनांक १५जुलै,२०११

२. संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०११/९२७,दिनांक १८.७.२०११

३. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक इबीसी-२०१४/ प्र क्र ४०/शिक्षण-१, दिनांक ४.३.२०१४

शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी वेळोवेळी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग , इतर मागासवर्ग या सामाजिक घटकातील विद्यार्थ्यांसाठी 2006-07 पासून शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीचे धोरण शासनाने मान्य केलेले असून ते शैक्षणिक वर्ष 2013-14 पर्यंत संदर्भाधीन दिनांक 4.3.2014 मधील शासननिर्णयानुसार सुरू ठेवण्यात आले आहे. त्या अनुषंगाने या संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशनियमावलीमध्ये वेळोवेळी शिक्षण शुल्क (१०० टक्के किंवा ५०टक्के प्रकरणपरत्वे )प्रवेशाच्या वेळी न घेण्याबाबत धोरण अंतर्भूत करण्यात आलेले आहे. संचालनालयाकडून शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील प्रवेशाची कार्यवाही तेच धोरण विचारात घेऊन पूर्ण करण्यात आलेली आहे. २०१४-१५ साठी सदर योजनेसंदर्भात शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे.

मात्र काही संस्था विद्यार्थ्यांनी शिक्षण शुल्क भरलेले नाही या सबबीवर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना परीक्षेला बसण्यास बाधा निर्माण करत आहेत अशा तक्रारी शासन व संचालनालयाकडे सातत्याने येत आहेत. ही बाब विचारात घेता आपणास कळविण्यात येते की, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेतलेल्या महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय उमेदवारांकडून प्रवेश घेताना शिक्षण शुल्काची ( १०० टक्के किंवा ५० टक्के प्रकरणपरत्वे )आकारणी करण्यात येऊ नये अशा सुचना संचालनालयाच्या संदर्भाधीन दिनांक १८.७.२०११ रोजीच्या पत्रान्वये यापूर्वी देण्यात आलेल्या आहेत. त्या सूचना विचारात घेऊन जोपर्यंत यासंदर्भात धोरणात्मक फेरसूचना शासन अथवा संचालनालय स्तरावरून देण्यात येत नाहीत तोपर्यंत हे धोरण सुरू ठेवावे.

उपरोक्त सुचनांचे पालन केले जात आहे किंवा कसे यासंदर्भात विभागीय सहसंचालकांनी आढावा घेऊन त्याबाबतची वस्तुस्थिती संचालनालयाच्या निदर्शनास आणून दयावी व कोणताही विद्यार्थी परीक्षेला बसण्यापासून वंचित राहणार नाही याची खबरदारी घ्यावी.

(दयानंद मेश्राम)

सहसंचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत: मा. प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन ,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी

---

पृष्ठांकन/तंशिस/विकाना/शैवि/२०१४-१५/ 591

दिनांक:- 25 FEB 2015

प्रति,

संचालक/प्राचार्य

सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविका तसेच तस्सम संस्था,

नागपूर विभाग, नागपूर

उपरोक्त पत्रात दिलेल्या निर्देशाचे काटेकोरपणे पालन करावे तसेच या कार्यालयास सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सहसंचालक,

तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,

नागपूर.